## प्रकरण तिसरे

आद्य कवयित्री महदंबा - कुलवृत्तांत, पूर्वचरित्र, नामकरण,

उत्तरायुष्य, महदंबेची वैशिष्टये, महदंबेचे निधन, महदंबेचे

जन्म-निधन अज्ञात, महदंबेचे श्रेष्ठत्व

# प्रकरण तिसरे

## आद्य कवयित्री महदंबा - कुलवृत्तांत, पूर्वचरित्र, नामकरण, उत्तरायुष्य, महदंबेची वैशिष्टये, महदंबेचे निधन, महंदबेचे जन्म-निधान अज्ञात, महदंबेचे श्रेष्ठत्व

### आद्य मराठी कवयित्री महदंबा:

प्राचीन मराठी काव्याचा प्रारंभ समजावून घेत असताना आद्य मराठी कवयित्रीचा मान सर्वस्वी महदंबेचा आहे असे अनेक संशोधकांचे मत आता बनले आहे. आणि म्हणूनच मराठी साहित्यात तिचा विशेषत्वाने आद्य मराठी कवयित्री म्हणून गौरव केला जातो. महदाइसा उर्फ महदंबेचे चरित्र एकत्रित स्वरूपात कोठेच पहावयास मिळत नाही. तिच्याबाबतची सर्व माहिती महानुभावपंथीयांच्या साहित्यात विखुरली आहे. मराठी साहित्यात तिने धवळे, मातृकी रुक्मिणी स्वयंवर ओव्या अशा प्रकारचे मोजकेच पण अतिशय श्रेष्ठ साहित्य निर्माण करून मराठी साहित्यातील काव्याचा स्त्रोत अखंड वहात ठेवला आहे. महानुभावपंथाने मराठी काव्याला दिलेली महदंबा ही एक अनन्य साधारण देणगी आहे. विलक्षण चौकस बुध्दी, अखंड जागृतता, अलौकीक प्रतिभा इ. असाधारण गुणांमुळे महदाइसा उर्फ महदंबा हिला महानुभावपंथात महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे.

### कुलवृत्तांत, पूर्वचरित्र व नामकरण:

महदंबेचे स्वतंत्र चरित्र लिहिले गेले नसले तरी ती संपूर्ण महानुभावपंथाच्या पोथ्यातील एक मध्यवर्ती व्यक्तिमत्व आहे. तिचे मूळ नाव रुपाईसा असे आहे. महदाईसा हे नांव तिच्या अलौकीक प्रतिभेमुळे श्रीचक्रधरांनी तिच्या पणजीच्या नावावरून तिला दिले आहे. वामनाचार्य हे तिचे पणजोबा.

वामनाचार्यांची पत्नी महदाईसा ही अतिशय संपन्न व्यक्तिमत्वाची होती. हे दोघे शके ११८२ ते ११९३ या कालखंडात देवगिरी येथील गादीवर असलेल्या महादेवरायास समकालीन होत. महदाईसाला होत असलेल्या भविष्य स्फुरणामुळे तिच्यावर विशेषत्वाने म्हाळसा या देवतेचा विशेष अनुग्रह होता. महादेवरायांच्या कुलाचे संपूर्ण पौरोहित्य महदाईसा करीत होती. अशा प्रकारचा उल्लेख पंथीय वाङ्मयात आढळतो.[१] उभयतांच्या पुत्राचे नांव महेश्वर पंडित होय. या महेश्वर पंडितास माधवभट व वायनायक अशी दोन मुले होती. महानुभाव पंथाचा सुप्रसिध्द पंथ प्रचारक व चक्रधरांचा पट्ट-शिष्य नागदेवाचार्य हा माधवभटाचा मुलगा होय. तर रुपाइसा ही वायनायकाची जेष्ठ कन्या होय. वायनायकाला महदाइसा, अपोलो, सावित्री, गायत्री, मदळसा, म्हाळसा, ललिताइसा, जाखाइसा आणि वेल्हाइसा अशी नऊ अपत्ये होती. यांच्यातील जेष्ठ महदाइसा होय. यातील अपोलो हा एकूलता एक मुलगा व बाकी आठ मुली असा त्यांचा परिवार होता. चक्रधरांनी या रुपाइसाचे तिच्या अलौकिक प्रतिभेमुळे महदाइसा असे नामकरण केले. पुढे केसोबासांनी रचलेल्या "रत्नमाला-स्त्रोत्राम" या संस्कृत काव्यात रुपाईसा उर्फ महदाइसाचे नांव "महदंबा" केलेले प्रथमच जाणवते. स्त्री नावाच्या पुढे "इसा" "वसा" हे प्रत्यय लावणेची पध्दत असावी असे एकंदर या नावामुळे वाटते.

## महदाइसाचे उत्तरायुष्य:

महेश्वर पंडिताचा वडील मुलगा माधवभट हा गौतमीच्या म्हणजे गोदावरीच्या दक्षिण तिरावर "पुरी" नावाचे एक नगर आहे. तेथे तो रहात असे. धाकटा मुलगा वायनायक हा रावस गावी रहात असे. माधवभट अल्पायुष्यातच निवर्तल्यामुळे त्याच्या मुलाबाळास वायनायकाने रावस गावी आणले. माधवभटाची तीनही मुले मोठी झाल्यावर वायनायकानेच त्यांचे व्रतबंध विधी केले व लहानपणीच त्यांचे विवाहही केले. त्याच वेळी त्याने

स्वत:ची मुलगी महदाइसा, पुत्र अपोलो व माधवभटाची मुलगी उमाइसा यांचेही विवाह केले. पुढे वायनायकाने माधवभटाचे मुलगे सारंगपाणी व नागदेव यांना शिक्षणासाठी म्हणून पुरी येथील शाळेत घातले. व तो स्वत: शेतीचे काम करु लागला व माधवभटाचा तिसरा मुलगा "वैजोबा" हा ही आपल्या हाताखाली शेतीसाठी घेतला. सारंगपाणी याने रत्नपरीक्षा विद्येत नैपुण्य संपादन केले व वायनायकाजवळील कांही द्रव्य घेऊन तो देशाटनास गेला. आपल्या या धंद्यात त्याने खूप मोठी प्रगती करुन तो स्वदेशी येत असताना चोरांनी त्याला लुटले. याच कालावधीत महदाइसा व उमाइसा यांनाही अकाली वैधव्य प्राप्त झाले. नागदेवाचार्य हा उनाड स्वभावाचा निघाला. मोकळा कासोटा आडवी वेणी व सर्वदा खांद्यावर तलवार अशा पोशाखात तो राहू लागला. त्याची आई आबाईसा ही या साऱ्या थाटामाटाला कंटाळली व वैतागून तिने राक्षसगाव येथे गुंफा बांधून राहू लागली. दोन विधवा मुली व स्वत:ही विधवा असल्यामुळे गावातील लोकांचा त्यांना त्रास होऊ लागला. याच कालावधीत श्रीचक्रधरांचा शिष्य दादोस उर्फ रामदेव हा त्यांना प्रथम भेटला व त्यांना तो ज्ञानदान करु लागला. त्यामुळे महदाइसा व नागदेवाचार्य हे दादोसाचे शिष्य झाले. पुढे दादोसामुळेच त्यांना चक्रधरांची माहिती होऊन त्या सर्वांना चक्रधरांच्या दर्शनाची उत्कंठा लागली. श्रीचक्रधरांच्या भेटीसाठी ते सर्वजण व्याकुळ झाले व दादोसामुळेच श्रीचक्रधर महदाइसा व नागदेवाचार्य यांची भेट "पाटवध" येथे झाली. यानंतरच्या काळात नागदेवाचार्य व महदंबा यांचे मन दादोसाकडून चक्रधरांकडेच वळलेले स्पष्ट दिसते. आपल्या चौकस, जिज्ञासू व चर्चक वृत्तीमुळे महदंबा ही चक्रधरांच्या विशेष प्रशंसेस पात्र ठरली होती. अखेरीस तिने चक्रधरांचाच अनुग्रह घेतला चक्रधरांचीही तिच्यावर विशेष कृपादृष्टी होती. हेही पहावयास मिळते. म्हणून पहिल्याच भेटीत श्री चक्रधरांनी तिला राहण्याची विनंती केली आहे.

हिवाळी येथे असताना महदंबेची आर्तता पाहून श्रीचक्रधर स्वामींनी तिला मुद्दाम बोलावणे पाठवले होते.[3]

वर्चक आणि जिज्ञासक महदाईसा:

महदाइसा ही चक्रधरांच्या सौंदर्याने वेधाली होती आणि म्हणूनच ती म्हणते, "आमचे गोसावी कैसे नागर[४] कैसे गोसावीयाचे डोळे बरवेजी[५] यावरून असे दिसून येते की, चक्रधरांच्या भेटीनंतर श्रीचक्रधरांच्या व्यक्तिमत्वामुळे ती त्यांच्याकडे वेधाली होती. एक दिवस तिने चक्रधरांना पूजा करून वाहिलेल्या वस्त्राचे मोल ती विचारते त्यावेळी चक्रधर म्हणतात. "हे वस्त्र आणाले लाहे यावी कव्हणी मोल करू ने ने".[६]

महदंबेची चक्रधरांवरील भक्ती वाढते आहे हे बघून दादोसाने तिला निवृत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यावेळी चक्रधरांनीही तिला फारसा प्रतिबंध केला नाही. पुढे दादोस तिला वाराणशीला पाठवण्याचे ठरवतो त्यावेळी मात्र (तिर्थक्षेत्रे अमोचके ईश्वरसन्नीधान मोचक) अशा नाना पध्दतीने पटवून देऊन चक्रधरांच्या सांगण्यावरून तिने आपला बेत रद्द केला. पण दादोसाने तिला पुन्हा जाण्यास तयार केले असे दोन तीन वेळा घडले व अखेर तिने जाण्याचे निश्चित केले. परंतु आपली शिष्या जाते आहे. हे पाहून तेथे गेल्यावर कसे वागावे याचा स्वामींनी तिला उपदेश केला आहे.[७] तिथे गेल्यावर मात्र तिला अत्यंत पश्चात्ताप झाला. वाराणशीला मनकर्णिका पाहताच तिला वाटले येथे काय आहे. उदकासारखी उदके, पाषाणासारिखे, पाषाण, झाडासारखी झाडे, माणूस, असे म्हणून ती आक्रोश करू लागली. आपणा स्वत:ला चक्रधरांचा सहवास अंतरला यामुळे ती दु:खी झाली हे सर्व दादोसामुळेच झाले असे ती म्हणू लागली. म्हणून वाराणशीला असतानाच हे तिलांजली जातीगोत्राशी, हे दादोसाशी असे म्हणून तिने त्यांचा त्याग केला व आता ती तनामनाने श्रीचक्रधरस्वामींना अनुसरली व

वाराणशीहून परत आल्यावर पश्चातापाने व्यग्र होऊन कोपऱ्यात रुसून बसली. तिला झालेला पश्चाताप बघून चक्रधर म्हणाले, "म्हातारी कागा ऐसी बैसलीयाचे ?" यावेळी नागदेवाचार्य म्हणाला जी.जी., द्वारावती येशी गेली, वाराणशीशी गेली, आता मलिनाथाकडी केदारा जावे असैल, म्हणोनी चिंता करत असे ती, यावर चक्रधर म्हणाले "आता म्हातारी तैसी नव्हे गा, आता म्हातारी आण एक होवोनी आली असे."[८] यानंतर दादोस तिच्यात परिवर्तन करावयास लागल्यावर दादोस व महदंबा यांच्यात भांडणही झाले आहे.[९]

तिने वेळोवेळी विचारलेल्या अनेक प्रश्नांमुळे केवळ तिचेच व्यक्तिमत्व नव्हे तर चक्रधरांचे पूर्वजीवन कांहीसे प्रकाशमान झाले आहे. महानुभाव पंथीय तत्वज्ञानाची आचार संहिता ही केवळ महदंबेने विचारलेल्या जिज्ञासक प्रश्नामुळे आकारली आहे. श्रीचक्रधरांनी दिलेली उत्तरे मार्मिक अशी आहेत. चक्रधर आणि महदंबा एक वेळी बसली असता ती चक्रधरांना विचारते. मासोपवास केल्याने काय होते ? जेव्हा ते म्हणाले पाप व पुण्य दोन्ही होते. आत्मपिंडे तेणे पाप होये. व्रत किजे तेणे पुण्य होये. अशा प्रकारचे उत्तर दिले.[१०] तात्पर्य, व्रत केल्याने जिवाला पीडा होऊन जीव मांस भक्षण करतो. म्हणूनच पाप होते. ती परत चक्रधरांना विचारते एकदा देह गेल्यानंतर होते ? श्राध्द केल्यास ते पित्रांना पावते का ? असे ती प्रश्न विचारते.[११] एकदा चक्रधरांनीब्रह्मनुभूती कोणाही जिवाला नाही म्हटल्यावर ती म्हणाली, "गोसावी ब्रह्म होय. आणि आम्ही होय, आणि आम्ही अनुभवती असो. यावर श्रीचक्रधर म्हणाले ऐसे तरी तुम्ही अनुभव देव म्हणा,[१२]

## महदंबेची गुरुभक्ती:

एकवेळ महदंबेने पुराण ऐकून आल्यावर चक्रधरांना विचारले, मृत्यूचे धर्म, जीवताप्रती कैसे सांधावे बाई, असे चक्रधरांनी त्याला उत्तर दिले.[१३] पुढे ती

चक्रधरांना विचारते कलीयुगाच्या शेवटी असे, असे होणार म्हणतात. ते खरे का ? तेव्हा चक्रधरांनी कलियुगाचे भीषण चित्र रंगवले व म्हणाले एकमेकांचिया घासा झोंबतील. बापूपुता पाठीमोरा ठाकेल. आणि हे दु:ख जरी येथचीया होईजे तर नाहीसे होईल असे सांगितले.[१४] महदंबा एकदा भिक्षेस गेली असता म्हणाते अवघा लोकु खाता : जेविता : लेईला, नेसला, डोल्हारेयावरी बैसला, ऐसा देखिला तेव्हा हे सारे तिला शोचनीय असे वाटू लागले. तेव्हा चक्रधर तिला टोचून म्हणाले. बाई, तुम्ही राजकुमरेकी.[१५] एकवेळ चक्रधर महदंबेला लवनाख्यान सांगत होते आणि हे आख्यान सांगताना त्यांनी संसाराविषयीचे निरूपण केले ते म्हणाले, "संसारु हा दीर्घ स्वप्न गो"[१६] एकवेळ महदंबा चक्रधरांना विचारते विठ्ठल विरु हा चक्रवर्तीचा अवतार म्हणतात ते खरे का ? तेव्हा चक्रधरांनी याही प्रश्नाचे सुंदर निरूपण केले आहे. अशा प्रकारे ती चक्रधरांना असंख्य प्रश्न विचारुन चक्रधरांची विविध मते अजमावते आहे. अशी ती ज्ञानसंपन्न आहे आणि जिज्ञासेपूर्तीसाठी प्रश्न विचारुन तिने चक्रधरांना बोलके केले आहे.

तात्पर्य, जसे महदाइसाचे व्यक्तिमत्व तिच्या बोलण्यातून साकारते तसेच चक्रधरांच्या संवादाने घडलेल्या आशयातून चक्रधरांचेही व्यक्तित्व प्रकटते. कांही वेळेला असा प्रश्न उभा राहतो. चर्चक, जिज्ञासक, पृच्छक, असणारी ही महदंबा जर महानुभावपंथाला मिळालीच नसती तर महानुभावपंथाचे साहित्य संपन्न झाले असते. काय ? याचे उत्तरही आपणाला नकारात्मकच द्यावे लागले. असते आणि म्हणूनच महानुभावपंथीयांच्या वाङ्मयातून एक महत्त्वाची केंद्रस्थानी असणारी ही महदंबा चक्रधरापेक्षाही कांही वेळा श्रेष्ठ वाटावयास लागते. महानुभावपंथालामहदंबा मिळालीच नसती तर चक्रधर, गोविंदप्रभू नागदेवाचार्य यांच्या संपन्न व्यक्तिमत्वाचा परिचय मराठीला आणि मराठी जनतेला घडलाच नसता. चक्रधरांच्या आत्मगताला बोलके करण्याची क्रिया

महदंबेमुळेच घडली आहे व मराठीतील खरे प्रश्नोपनिषद तिच्यामुळेच अस्तित्वात आली आहे हे नाकारून चालणार नाही.

चक्रधरांच्या सहवासात असताना पूर्वी अभ्यासलेली पुराणे, त्यांच्यातील मनाला खटकणा-या गोष्टी ती चक्रधरांना अनेक वेळा विचारी. इतकेच नव्हे तर मनासारखे उत्तर मिळाले नाही तर त्याचा छडा लागेपर्यंत ती वाद घालीत असे त्यातूनच 'रुक्मिणी स्वयंवर' चक्रधरांच्या चर्चेतून व महदाइसाच्या प्रतिभासंपन्न विचारसरणीतून आकाराला आले आहे. चक्रधरांच्या निर्याणापूर्वीच्या लिळा वाचकांच्या हृदयाला हेलावणा-या आहेत. महदंबेचे वडील वायनायक निधन पावल्यानंतर पितृनिधनाचे दुःख तिला खूपच झाले आहे. परंतु समाजाचाराला आपण गेलो तर तेवढा काळ आपणाला ईश्वरभक्तीचा विसर पडेल. असे ती चक्रधरांना सांगते आहे. त्यावेळी श्रीचक्रधर म्हणतात, "मग माझे कांही घडले तर काय कराल ?" त्यावर महदंबा म्हणते "गंगातीरावर गोविंद गोविंद म्हणत राहू" यातून तिची चक्रधरावरील भक्ती त्यांचा हवाहवासा वाटणारा सहवास याचेही चित्रण होते. बाईसा गेल्यानंतरच्या काळात चक्रधरांच्या स्नानभोजनाची कुचंबणा होऊ लागली. तेव्हा महदंबेने डेराभर पाणी तापवून चक्रधरांना न्हावू, माखू घातले. मर्दनामादणे केली आणि बाईसा पुजावसरे करीत असे. असे म्हणून तिने दंडवत घातले.[१९] "एकेवेळी महदाइसा जेवत असताना तुपाचा डबा घेऊन चक्रधर तिला वाढू लागले. तेव्हा निराकरिले तशी त्यांचीच आज्ञा असल्याचे तिने सांगितले तेव्हा चक्रधर म्हणाले, "पोरेहो, तुमचे याकडुनी तुम्हासी कांही न व्हावे: येथूनी तुम्हा सकळे हुआवेळी: आणि नंतर तिने तूप घेतले.[२०] अशा प्रकारे महदंबेला आपले गुरु चक्रधर यांच्याबद्दल अत्यंत आदर होता याचे प्रत्यंतर येते.

## महदंबेची प्रतिभा खळाळणा-या झ-यासारखी:

महदंबेच्या जिज्ञासू वृत्तीमुळे चक्रधरांना तिला पटेल असे शाश्वत सत्य

वेळोवेळी सांगावे लागत असे आणि म्हणून चक्रधर हे नागदेवापेक्षाही अधिक माहिती देत असत. एकदा महदाइसा चक्रधरांना विचारते, ज्ञान- जालेयावरि प्रेमासी उपाओ असे ? त्यावर चक्रधरांनी तसा उपाय असल्याचे सांगितले हे जेव्हा नागदेवाचार्याला समजले तेव्हा त्यांनी चक्रधरांना विचारले त्यावर चक्रधर म्हणाले, "तुम्ही कधि विचारले ? विचारले असते तर सांगितले असते. म्हातारी जिज्ञासक, म्हातारी चर्चक, म्हातारो येतकाही पुसतची असे. हे ऐसे तुम्हासाचे पुरवी की गा . आणि शेवटी नागदेवास म्हणाले येथोनि तुम्हासी आचार्य होआवे लागले. हे तुमचे लागे.[२१] अशा प्रकारे महदंबेची प्रतिभा ही खळाळणाऱ्या निर्झरासारखी प्रवाही असलेली पहा- वयास मिळते. चक्रधरांना अशा विविध प्रश्नांनी ती अजमावून घेते आहे व स्वत: संपन्न होते आहे. त्याचबरोबर नागदेवाला आचार्य घडवण्याचा ती पुरेपूर प्रयत्न करते आहे. नागदेवाचार्य आपला भाऊ आहे. त्यापेक्षा तो आपल्या पंथाचा आचार्य आहे आणि त्याला खऱ्या अर्थाने घडवण्याची जबाबदारी आपल्यावरच आहे. याची तिला पुरेपुर जाण आहे. नाग- देवाचार्यांची भावविवश वृत्ती तिने चांगली ओळखली आहे. चक्रधरांच्या प्रयाणानंतर गुरुविरहाने वेडापिसा झालेल्या नागदेवाला ती गोविंदप्रभूकडे घेऊन येते आणि नागदेवाला अशाही स्थितीत ती आधार देते. त्याची समजूत घालते हे नागदेवाला सावरणे म्हणजे महदंबेचे महानुभावपंथावरील सर्वात मोठे उपकार आहेत. महदंबा नसती तर नागदेवाचार्य सावरु शकला नसता आणि तो पंथाचा आचार्यही झाला नसता. धर्माला येथेच अवकळा प्राप्त झाली असती. नागदेवाचार्यांची आपण बहिण आहोत याची तिला जाणीव होतीच पण त्याचबरोबर नागदेवाचार्य धर्माचा आचार्य आहे याचीही तिला जाणीव होती. श्रीचक्रधरांचा नागदेवावरील लोभ आणि विश्वास ती जाणून आहे. पंथाला सावरण्याचे उत्तरार्धातील कार्य नाग- देवच अतिशय चांगल्या प्रकारे करु शकेल हे चक्रधराबरोबरच तिनेही ओळखले

महदाइसा ही चक्रधरांच्या विश्वासाला पात्र होतीच हे जितके खरे आहे. त्याचबरोबर नागदेवाचार्यांत भावी पंथाचा वारस असल्याचे तिला ज्ञात आहे आणि म्हणूनच ती नागदेवाला घडवण्यासाठी वैविध्यपूर्ण संपन्न प्रश्न विचारुन त्याची आशयातीत उत्तरे समजावून घेत आहे. अशा प्रकारे तिची असणारी प्रतिभा ही चैतन्यदायी आहे.

## जबाबदारी जाणून घेणारी व देणारी महदंबा:

नागदेवाला आपल्या पंथाचा आचार्य करावयाचा आहे आणि म्हणून त्याला धर्माचरण समजावून द्यायला हवे आणि म्हणून धर्मातील सत्य ती चक्रधराकडून जाणून घेते आहे. आणि जे स्वत:ला ज्ञात झाले ते नागदेवाचार्याला ती समजावून सांगते आहे. ही आपल्यावरील जबाबदारी महदंबेने उत्तरोत्तर पेलली आहे. एकमेकांचा एकमेकावर अधिकार आहे ही ती जाणून आहे. नागदेवाचार्याला महदंबेविषयी विशेष आदर आहे व तसा तो प्रथमपासून होता. भरकटत चाललेल्या आपल्या जीवनाला तिनेच वळण लावले आहे अशी एक कृतज्ञतेची भावना नागदेवाचार्याची होती. आणि म्हणूनच महदंबेची गणना तो आपल्या आयुष्यातील प्रिय व्यक्तित करत असे त्यामुळे शपथ घ्यायची झाली तरीही तो महदंबेची शपथ घेत असे. केसोबासांनी एकदा नागदेवाचार्याला विचारले ते म्हणाले तुम्ही म्हैची आणि पाचाश गुरुकुळाची आण का वाहता ? तेव्हा नागदेवाचार्यांनी सांगितले ... म्है भाण खोडावूनी आणिले कडिये, खांदिये घेऊनी, श्रीप्रभुचिये दर्शना आणिले, नेसविले, पांघुरविले, येसने सायास केले शेते घोसावी मज निरोविले म्हणूनी मी म्हैची आण वाहे.[२२] अशा प्रकारे नागदेवाचार्याला तिने मार्गावर आणले. त्याला घडविले – जडविले सन्मार्गी लावले, नव्हे तर जीवनाच्या शाश्वत मार्गावर आणून नागदेवाचार्याला मार्गस्थ केले आहे. ही जबाबदारी तिने नाकारलेली नाही. एकवेळ महदंबा नागदेवाचार्याला कृष्ण द्रौपदीच्या बंधु-

भगिनी प्रेमाची आठवण करुन देते. एकदा नागदेवाच्या पायात केसतोड निघाला तेव्हा त्या जखमेवर महदंबेने प्रासादाचे वस्त्र फाडून पट्टी बांधली. तेव्हा नागदेवाचार्यांनी तिला विचारले, अग प्रसादाचे वस्त्र कशाला फाडलेस? त्यावर ती म्हणाली, "नागदेया प्रसाद-प्रसाद बांधिजताये" अशा प्रकारे महदंबेचे उत्तर ऐकून तो आवाक झाला. बंधू बरोबरच आचार्य म्हणूनही तिच्या ठिकाणी आदरभाव होता. या -हद्य भावनेचे चित्रण या प्रसंगात अतिशय सार्थ चितारले आहे. आणखी एका प्रसंगात पर्व असलेल्या दिवशी कार्य करावे असा तिचा प्रश्न ऐकून नागदेव म्हणाला, परमेश्वर स्मरणात सदापर्व असते, तेव्हा दुना जाप्य करावा दुनी प्रसाद सेवा करावी, अशा प्रकारचे निरुपण महदंबेने आदराने स्वीकारले. जशी नागदेवाला ती मानते आहे. त्याचबरोबर आपला अधिकारही ती त्यांच्यावर सांगते आहे आणि त्याचबरोबर आचार्य पदाची जबाबदारी किती श्रेष्ठ दर्जाची आहे. याची जाणिव ती नागदेवाला देते आहे. एकवेळ नागदेव विडा खात असता तिने हातातील पाने हिसकावून घेतली. एकून देऊन म्हणाली, "नागदेवा देशाविन झिजणे ते हेच काय ? मा पाणी कैसे खाणे, असे म्हणून ती त्याच्यावर रागावली. परंतु नागदेवही तिला उलट कांहीही बोलला नाही. नंतर काही वेळानेमहदंबेने उत्तम पानाचा विडा तयार करुन नागदेवाला दिला. त्यावेळी नागदेव आश्चर्यचकित झाले. आणि आता काय म्हणून देनेस ? यावर महदंबा म्हणाली, पोरेहो तुमचेयाकडून तुम्हासि कांही न व्हावे. तुम्हा येथूनी सकळी होवावी की : मग आता "माझिया प्रिती घेया, असे म्हणून तिने नागदेवाचार्याला विडा करुन दिला या कृतीतून नागदेवाच्या अधिकाराची जाणीव तिने करुन दिलेली आहे. कोणत्याही अधिकारावरील व्यक्तीने स्वत: अधिकाराची इच्छा बाळगून नये तर भक्तजनांनी स्वइच्छेने दिल्यास त्याचा स्वीकार करणेस हरकत नाही. यातून आचार्याच्या स्थानाचे श्रेष्ठत्व नागदेवाला तिने पटवून दिले आहे. अशा प्रकारे महदंबेने स्वत:ची जबाबदारी ओळखलेली होती व नागदेवाचार्याला त्याची जबाबदारी काय आहे. ती समजावून दिली होती.

आधार देऊन सावरणारी महदंबा:

श्रीचक्रधरांच्या निर्याणानंतर उरलेल्या सर्व शिष्यांना महदंबेने मनी-माणसे सावरले आहे. चक्रधरांच्या विरहाने व्याकुळ झालेल्या सर्वच शिष्यांना घेऊन दु:ख निवारण्यासाठी नागदेवाचार्यासह ती गोविंदप्रभूंच्या आश्रयाला आली आणि निराधार झालेल्या शिष्यांना तिने आधार देवून सावरण्याचा प्रयत्न केला.

महदंबेची काव्यस्फूर्ती:

गोविंदप्रभूंच्या सहवासात सर्व शिष्यांना घेवून ती आश्रयाला आली. इथेच ख-या अर्थाने महदंबेच्या प्रतिभेचा मोहर मोहरून आला आहे. गोविंद-प्रभूंच्या सहवासातच तिची धवळ्याची साहित्यकृती आकाराला आली व महदंबेचे खरे व्यक्तिमत्त्व जनसामान्यांच्या प्रत्ययाला आले.[२३] त्याच्यातील महत्त्वाच्या लीळामधून अधिक स्पष्ट होते. लीळाक्रमांक १४ या लीळेत तिचा सुरवातीचा उल्लेख आढळतो. त्याचबरोबर गोविंदप्रभू चरित्रातील लीळाक्रमांक ८५, ८६, ८७, ८८, ८९, ९०, ९१, ९२ या लीळामधून तिचे व्यक्तिमत्व सलगपणे उलगडत गेले आहे. त्याचबरोबर लीळाक्रमांक २२४, १२१, १२२, १३०, १३१, १५३, ३१७ या लीळांमधून महदंबा ही गोविंदप्रभूंच्या जीवनाच्या मध्यावर त्यांच्या सहवासात आल्याचे स्पष्ट होते. महदंबेशी संबंधित असलेल्या या १६ लीळापैकी लीळाक्रमांक २२४ "विवावो स्विकारु.[२४] ही लीळा अत्यंत महत्त्वाची आहे. या लीळेतून तिला धावळ्यांची निर्मिती कशी झाली याचे चित्रण चित्रीत झाले आहे. इथेच तिला धावळ्यांची स्फूर्ती झाली व तिने धावळे गायीले याची प्रथम सूचना आपणास मिळते, एके दिवशी सर्व भक्तजण भिक्षे-करता गेले होते तेव्हा एक तेलीण वधुवराकरिता बाशिंगे नेत होती. तिला महदाइसाने म्हटले अगा, तेलीणी, एक बाशिंग आमच्या गोसावियाकरिता दे तेव्हा तिने आणखी एक चांगले बाशिंग केले ते गोसावियाच्या श्रीमुगुटावरी बांधिले तेव्हा गोविंदप्रभु म्हणाले, "अवो मेली जाय: काकण बांध म्हणे,

बोने करावे म्हणे, मांडव घालाव म्हणे, अशा प्रकारे सर्व तयारी झाल्यानंतर इश्वरनायकाने आपली कन्या देऊ केली. सर्वांना जेवणावळ घातली आणि गोविंदप्रभु म्हणाले आवो मेली जाय गाये, गाये म्हणे, महदाइसेने विचारले काई गाऊजी ? गोसावी म्हणाले आवो कृष्ण रुक्मिणी गाये म्हणे, तुम्ह्या थाट गाये म्हणे, आणि महदाइसेला स्फूर्ती झाली. इतुकेनि रुक्मिणी स्वयंवर गावोचि लागली. "निरूता लागला जीवी: हे कडवे गाईले.[२५] अशा प्रकारे महदंबेची पहिली काव्यकृती आकाराला आली चक्रधरांना तिने वंदन केले मनात त्यांचे पूजन करून आशिर्वाद घेतला आणि तिने धावळ्याचे प्रथम चरण गाईले.

श्री सर्वेश्वराचे शिरी धारुनिया चरण
मग धावळी गाइन गोविंदुराणा
जेणे रुक्मिणी हरीयली तेणे पवाडे केले अति बहुत:
पाविजे परमागती भक्ती आइकता कृष्णाचरित्रा: ।। १ ।।
जयजय श्री प्रभुगोविंदा:[२६]

अशा त-हेने आद्य मराठी कवयित्रीचा पद्याचा मान मिळवणा-या महदाइसाला काव्यप्रतिभा जागृत झाली व तिने धावळे गावयास सुरूवात केली असे हे उत्स्फूर्त काव्य परमदैवताची आज्ञा, आवडता, विषय, अनुकूल वातावरण यामुळे महदंबेच्या वाणीला नवतेज प्राप्त झाले आणि रुक्मिणी स्वयंवर काव्याचा धावळे म्हणाने जन्म झाला. तिच्या या काव्यश्रवणाने गोविंदप्रभूच इतके भारावले की त्यांना तन्मयताच प्राप्त झाली. त्यांची तहान भूक हरवली. अशा प्रकारे चार दिवस रुक्मिणी स्वयंवराचे गाणे झाले आणि मग गोविंदप्रभूची प्रवृत्ती भंगली "चौथा दिशी झाडे झाले मग प्रवृत्ती भंगली,[२७] असे सांगून गोविंदप्रभु चरित्रातील विव्हावो स्विकारु प्रसंग संपतो अशा प्रकारे धावळ्याच्या पूर्वार्धा महदंबेच्या मुखातून उत्स्फूर्त गाईला गेला परंतु काही विचारवंताच्या मते धावळ्याच्या उत्तरार्धाची रचना मात्रा महदंबेची

MR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

नाही. तर ती म्हाइंभट्ट व लक्ष्मींद्रभट्ट यांची आहे. परंतु ही उत्तरार्धाची रचना ही महदंबेनेच गाईली आहे. नव्हे तिच्या गायनासाठी तयार केलेली आहे. म्हणूनच हा वाद बाजूला ठेवून ही धवळ्याची रचना महानुभावसंप्रदाय महदंबेचीच मानतो व तसा तो रूढही झाला आहे. केवळ महदंबेने धवळेच गाईले नाहीत तर तिने चक्रधरासाठी कांही ओव्याही गाईल्या आहेत. चक्रधरस्वामी पैठणाला असताना त्यांच्या उपहारासाठी दळणकांडण करत असताना तिने चक्रधरावरील आपल्या भक्ति पोटी अनेक ओव्या गाईल्या आहेत. ती एक दिवस सोजी काढता काढता म्हणू लागली,

गोमतीए तीरी : निळ्या गूढरा : राजेया गुजरा : कृष्णराया
नीळा गुढरु : राजा गुगरु : माणीकी मंढपी श्रीचक्रधरु गोमटे माजीटे :
आखा कुंडीचे : राजेया डौडीचे : चक्रधरा गोरे अंग बाहीया :
हवरीया चंदने : श्रीचक्रधारा त्रुबणे : दीटी होए. बापु म्हणे की
भाईया : माझेया साजणी : गोत तो साजणीचाही यावो.

अशा प्रकारच्या ओव्या ती गावू लागली. "बापु म्हणे की भाईया असे शब्द ऐकून बाई : ऐसिया ओविया बापा भाउवासी गायीजती की यावर महदंबा म्हणाली. जी जी गोसाविची भाउ : गोसाविची साजणी गोत : अशा प्रकारे महदंबेची ही शीघ्र काव्य रचना चक्रधर स्वामीच्या आर्ततेचे चिंतन करते. महदाइसेच्या स्वभावाचा विशेष स्वामीच्या प्रयाणानंतरही दिसून येत होता. नागदेवाचे या खांदावरि करु - राजा चक्रधरु बीजेकरी.। सोनेसळी शेला नेसला माळांठी : म्हाईया आला भेटी प्रभुचिये.[२८] अशा प्रकारची चक्रधरांची अनेक काव्यात्म स्मरणे ती नेहमीच करत असलेली दिसून येते.

याच पध्दतीने महदंबेच्या नांवावर मातृकी रूक्मिणी स्वयंवर याचीही रचना तिच्या नांवे केलेली पहावयास मिळते. गर्भकांडाच्या ओव्याही तिच्या

A
11932

नांवावर असलेल्या पहावयास मिळतात. परंतु त्याची मूळ प्रत मात्र अभ्यासावयास मिळत नाही.[२९] या रुक्मिणी स्वयंवराची एकंदर ११० कडवी आहेत. शिवाय इतर हस्तलिखित प्रतीत सापडलेली ७९ अधिक कडवी बारीक अक्षरात निराळी छापली आहेत.[30] अशा प्रकारची विविध काव्यरचना सिध्द केली आहे. महदंबेने आपले कर्तव्य चक्रधर, गोविंदप्रभू, नागदेवाचार्य यांच्या बाबतीत बजावले आहे. त्याचबरोबर चक्रधरांच्या सर्व शिष्यांबरोबर ती सदैव अधिकार वाणीने वागलेली आहे. महदाइसा व्यक्ती या नात्याने जे तिचे स्वभावचित्रण झालेले आहे. त्या स्वभावाचे कांही पैलु आपणाला वाचावयास मिळतात त्यापैकी कांही अशी-

अ) स्त्रीसुलभ मत्सर:

महदाइसा ही स्त्री असल्याने तिच्या ठिकाणी स्त्री सुलभ असणारे सर्व गुण आणि अवगुण आहेतच. त्यातील स्त्रीसुलभ मत्सर तिच्या स्वभावाच्या ठिकाणी आहे. ती गोविंदप्रभूच्या सहवासात असताना आबाइसा ही महदंबेची नात्याने चुलती परंतु गोविंदप्रभूची सेवा करत असताना तिचे महदंबेशी वागणे मात्र सरळ नव्हते. गोविंदप्रभूसाठी महदंबेने एक वस्त्र धोतले होते. जुने झाल्यानंतर आबाइसा ती नेसली हे महदंबेने पाहिले व महदंबेला तिचा अनावर राग आला व ती म्हणाली, "हे काय आमचे वस्त्र ही कशी नेसली ते आमच्या गोसाव्याच्या पायाखाली किंवा जात्यापाठा, मुसळाखाली गवसणी म्हणून राहील. पोतेरे होईल. तिचे हे शब्द ऐकताच आबाइसाने ते वस्त्र टाकून दिले. गोविंदप्रभूनी तिला चांगले वस्त्र आणून नेसावयास दिले. हे ऐकल्यावर मात्र महदंबेला फार दु:ख झाले.[३१]

ब) स्वभावातील स्पष्टोक्ती (घडेतोडपणा):

महदंबा ही स्वभावाने अतिशय सडेतोड होती. एकदा गोविंदप्रभु सर्व शिष्यांवर रुसले होते. तेव्हा दादोसाने हा दोष महदंबेला दिला. तेव्हा तिला दादोसाचा अतिशय राग आला व तिला हा आळ सहन झाला नाही.

तेव्हा ती फणाका-याने दादोसाला म्हणाली, दादो तुम्ही उगे असा हो. फाटकापावो सोनका , गोसावी उदास झाले ते एक, आणि तुम्ही कोपता ते दुसरे,[३२] याच दादोसाने यात्रेला जाण्याची शक्कल काढल्यामुळे आपली गुरुसेवा चुकल्याची महदंबेला अनावर दु:ख झाले. तिला दादोसाचा खूपच राग आला, त्या भरात तिने दादोसाच्या नांवाने तिलांजली दिली.[३३]

क. पंथनिष्ठा:

पंथनिष्ठा हा तर महदंबेचा प्राण होता. पंचकृष्णाखेरीज अन्य देव-देवता मोक्षादायक नाहीत असे महानुभावपंथ मानतो. परंतु आपला भाऊ अपोलो मात्रा अनेक देवदेवतांची पूजा करतो. हे जेव्हा तिच्या प्रत्ययाला आले तेव्हा महदंबेने गृहत्याग केला, तेव्हा त्याने देव्हा-यातील सर्व देव नदीत नेऊन फेकून दिले व महदंबेची क्षामा मागितली. अशा प्रकारे महदंबा ही धर्माभिमानी होती.[३७]

ड. पाकनिष्णात सुगरण:

महदंबा ही स्त्री असल्यामुळे स्त्री स्वभावामुळे ती पाकनिष्णात होती. पाक कलेच्या बाबतीत ती चांगली सुगरण होती. वेगवेगळे पदार्थ ती मोठया कौशल्याने तयार करीत होती. काशीयात्रेला जाण्यापूर्वी तिने चक्रधरांना तांदळाचा भात, तांदळाची खीर, दहीवडे अशा प्रकारचा स्वेत आहार खाऊ घातला. अशा प्रकारे ती अतिशय चांगल्या प्रकारची सुगरण होती. याचे प्रत्यंतर येते.[३४]

ई. वैराग्य:

महदंबा ही विरागिणी होती. वैराग्य हा तिच्या जीवनाचा जीवनार्थ होता. केसोबास एकदा दुपारचे वेळी निवांत वामकुक्षी करताना महदंबेस दिसला

त्यावेळी महदंबेला त्याचा राग आला व ती रागाने म्हणाली, "जया एक वैरी असे असे तो देहनिद्रा न करी, मातुम्हा तव चौदाही वैरी असती", अशा शब्दात तिने कानउघाडणी केली.[35]

ड. कलासक्तता:

महदंबेचे आणखी एक वैशिष्टय म्हणजे ती कलासक्त होती. तिला कलेविषयी अत्यंत आवड होती. ती गोविंदप्रभूंच्या सहवासात असताना सकाळच्या वेळी अतिशय सुंदर रांगोळया काढी व अंगण सुशोभित करीत असे.[36]

ऊ. प्रतिभासंपन्नता:

महदंबाही अतिशय प्रतिभासंपन्न होती. त्याचे प्रत्यंतर वेळोवेळी आले आहे. आणि त्याचमुळे तिला सहज काव्य स्फूर्ती होत होती. तिची प्रतिभा ही दगडातून पाझरणाऱ्या जलस्त्रोतासारखी होती. एका प्रसंगी तिने नागदेवाचेया स्वांदावरि करु ; राजा चक्रधारु, बीजे करी, अशा दोन ओवीया गायील्या. या ओव्या ऐकून नागदेव म्हणाला नाथाची, नाथवाणी आणि स्रीची सिध्दवाणी.[38]

अशा प्रकारे महदंबाही विविध कलागुणांनी संपन्न होती. तिला आपले गुरु चक्रधार यांचेविषयी विशेष आदर होता आणि म्हणूनच चक्रधारांच्या निर्याणानंतर ती जीवनात रमू शक्लेली नाही. तत्कालीन असणाऱ्या उच्च वर्गीयाकडून महानुभाव पंथाच्या सर्व शिष्यांना त्रास होऊ लागला. लोक त्यांचा छळ करु लागले. तेव्हा महदंबेला जगणेच अवघड झाले. चक्रधारांच्या एकाकी अवस्थेत चक्रधार पैठणाला असताना त्यांनी तिला व म्हाइंभट्टाला बोलावणे पाठवले. परंतु महदंबा तावडतोब जाऊ शकली नाही. तेव्हा चक्रधार म्हणाले, "खाचले प्राणिये, गेलिया बुध्दी प्राण्यांची आमुचिया

वरील श्रध्दा नाहीसी झाली. त्यांचा देह खचला.[३९] त्यानंतर महदंबा तीन महिन्यांनी चक्रधरांच्या भेटीला आली. त्यावेळी श्रीचक्रधरांना खूपच वाईट वाटले. ते महदंबेला म्हणाले, बाई एखाधाच्या घरी कुणी सरते मरते तर त्याची चौकशी करतात, घरच्या लोकांचे समाधान करण्यासाठी त्याला भेटावयास जातात. आमच्या बाबतीत तुम्ही इतकीही आस्था दाखवली नाही. त्यावेळी महदंबेने क्षमा याचना करून आपल्या न येण्याचे यथोचित कारण सांगितले व म्हणाली, हा लोको दुराराध्य ईश्वरपुरूषा होती. तया ते त्रासधिती होये. देखोनशक्ती[४०] आणि तिने चक्रधरांना "ज्ञानांकुशाची आख्यायिका सांगितली.[४१] अखेरच्या क्षणी चक्रधरांनी नागदेवाचार्यांची व महदंबा यांची समजूत घातली. बाइसेने देहत्याग केल्यानंतर हाल-हाल होऊ लागले. चक्रधरांना अनेक दिवस अंघोळही मिळेनाशी झाली. हे जेव्हा महदाइसेला समजले तेव्हा तिला खूप दु:ख झाले. तिने चक्रधरांना उत्तम स्नान घातले. त्यांचा पूजा विधी केला. परंतु नागदेवाचार्य त्यांच्यावर रागवू लागला. "हे अवघे वोरवटे तुम्हीची केली.[४२] असे म्हणून तो शिव्या शाप देऊ लागला. एक दिवस स्वामी वाळवंटात बसले असता समोरून महदंबा धोतरे धुवून येत होती. स्वामीजवळच असल्यामुळे महदंबेने त्यांना दंडवत घातला. तेव्हा नागदेवाचार्य तिला रागावून म्हणाले, "हे काई सौ: राना आलेयाही पर तुमा हाती जिवो, तथा आसू न लावो, हे घाटीचे ब्राह्मण देखा असेती, हे अवघे होत आहे. तुम्हा स्त्रीयाचेनेकी आजू हे कैसे आलेती, हे अवघे वोरवटे होये ते तुम्हीच केले अशा प्रकारचा नागदेवाचा वृथाकोप पाहून चक्रधरांनी त्याला शांत केले व म्हणाले, "म्हातारी तुम्हासी लागे किंवा कवणेही अर्थे वंचिजेना" असे म्हणून महदाइसाची काळजी नागदेवाचार्यावर सोपवली आणि महदाईसालाही नागदेवाचार्यांची योग्यता ओळखून त्याला योग्य तो मान देण्यास सांगितले. अशा प्रकारे महदंबाही चक्रधरांच्या अखेरच्या साक्षीदारापैकी एक आहे.

यानंतर महदंबा नागदेवाचार्यांना घेऊन परत आलेली आहे आणि तिने पंथाचे उरले सुरले कार्य नागदेवाचार्यांना बरोबर घेऊन सुरु ठेवले आहे. नागदेवाचार्यांना ती वेळोवेळी स्वत:ची जाणीव करुन देताना दिसून येते. महदंबेला हे कार्य करीत असताना चक्रधराइतकाच गोविंदप्रभूंचा लळा आहे. परंतु तो चक्रधरांच्या इतर शिष्यांत नाही. याचे प्रत्यंतर स्मृती-स्थळ वाचत असताना सतत जाणवल्याशिवाय रहात नाही. चक्रधर निर्याणानंतर त्यांच्या संपन्न व्यक्तिमत्वाच्या आश्रयाने विकसित झालेली शिष्यांची मने गोविंदप्रभूंच्या सहवासात खऱ्या अर्थाने रमूच शकली नाहीत. एक दिवस महदंबा नागदेवास ऋद्धीपुरला गोविंदप्रभूंच्या भेटीसाठी चलण्याचा आग्रह करते. परंतु नागदेव मात्र त्याला नकार देतो. आपले खरे गुरु चक्रधरच आहेत हे तो सांगत रहातो. "मग महदाइसी "म्हणीतले, नागदेया गोसावीयापाशी चला जावो, भटोबाशी म्हणीतले नेणोमा तुझा श्रीप्रभू माझा देव तो चक्रधरु वो:[४३]

परंतु महदाइसा नागदेवाचार्यांची समजूत घालते आणि त्याला गोविंद-प्रभूंच्या दर्शनभेटीसाठी घेऊन येते. गोविंदप्रभू जेव्हा महदंबेला पाहतात त्यावेळी गोविंदप्रभूंना तिला पाहून आनंद होतो. परंतु नागदेवाचार्याला मात्र आपले चक्रधर इथे नाहीत त्यामुळे अधिक दु:खच होते. त्यामुळे गोविंदप्रभू म्हणतात, "तव म्हहदाइसे भटोबासाते घेऊन आली. श्रीप्रभू देखोनि म्हणीतले आवो मेली जाये, येतो नव्हेती, चांगदेवो राऊळाची भटोबासा महदाइसा थोर दु:ख झाले.[४४]

चक्रधरांच्या मानसमूर्तीचे मनीमानसी चिंतन करणाऱ्या महदंबेचे जीवन चक्रधरमय होऊन गेलेले आहे. चक्रधर चरित्रातून महदंबा एका उच्च पातळीवर वावरताना दिसते आहे. ती जेव्हा चक्रधरांना असंख्य प्रश्न विचारुन चक्रधरांचे व्यक्तिमत्व आपणासमोर उलघडते आणि चक्रधर वाचकासमोर

फूल पाकळ्याप्रमाणे विकसित होत जातात या दृष्टीने तिचे प्रश्न अतिशय महत्त्वाचे आहेत. तिचे हे प्रश्न केवळ प्रश्नासाठी नाहीत. तर एका एका प्रश्नातून केवळ चक्रधरच नाही तर अवघा महानुभावसंप्रदायच तिने संपन्न केला आहे आणि म्हणून हे तिचे प्रश्न मराठी साहित्याला उपकारक ठरले आहेत. आणि विशेष म्हणजे या प्रश्नोत्तरातूनच महानुभावपंथाच्या ग्रंथाचे रुप सिध्द झाले आहे.

महदंबा ही केवळ मराठीतील आद्य कवयित्री उरत नाही किंवा केवळ ती चक्रधरांची शिष्या रहात नाही तर ती अवघ्या महानुभाव पंथाची सर्वसमावेशक धर्मरक्षक झाली आहे. हे नागदेवाचार्यांच्या बोलण्यातून सिध्द झाले आहे. नागदेवाचार्य म्हणून महदाइसेला म्हातारी माझेया धर्मरक्षण गा, असे म्हणून तिचे श्रेष्ठत्व वर्णिताना दिसून येते. अशा प्रकारे नागदेवाला तिचा सार्थ अभिमान आहे. तिच्या वाणीबध्दलही नागदेवाचार्याला मोठा आदर आहे आणि म्हणूनच तो तिच्या वाणीला "सिध्दवाणी, असे म्हणतो. ✓

महदाइसाचे निधन:

शेवटी सर्व शिष्यांना स्वत:बरोबरच आपल्या पंथाचे श्रेष्ठत्व सांगते महानुभावपंथाला ती एका उच्चतम् पातळीवर स्थिर करते आणि नागदेवाचार्याला बरोबर घेऊन ती परत येते. महदाइसा नवगावी गेली असता ती पायास व्रण होवून आजारी पडते आणि दिवसेदिवस या आजाराने ती जर्जर होते. ही बातमी जेव्हा नागदेवाचार्यास कळते तेव्हा नागदेवाचार्य अत्यंत दु:खी होतो. महदाइसाच्या आजाराने तो पुरेपुर खचून गेला आहे. आपल्या पाठीवर आता कोणीच नाही याची जाणीव त्याला झाली आहे आणि त्यामुळे त्याला आपल्या एकांकीपणाचे दु:ख जाणवू लागले आहे. नागदेवाचार्य तिच्या आजारावर औषधोपचार करण्यासाठी वैद्य बोलावून आणतो. परंतु महदंबा जीवन पातळीच्या पूर्णत्वाला पोचली आहे त्यामुळे ती नागदेवाचार्याची

समजूत घालून आपण या आजारातून बरे होणार नाही. आपण उपचार करून घ्यावेत अशी सर्वव्यापी चक्रधरांची इच्छा राहिलेली नाही. ती आपल्या मृत्यू-साठी आता आतूर झाली आहे. म्हणून ती म्हणते नागदेवा गोसाव्यानी डाग देण्यास किंवा रक्त काढण्यास अनुज्ञा दिली नाही. औषध घेण्यास मात्र परवानगी आहे. परंतु मी आता जगणार नाही. मग विनाकारण आज्ञाभंग तरी कशाला करायचा असे सांगताना ती म्हणते, नको नागदेवा, मी वाचेना यावर नागदेवाबरोबरच वैद्याचाही निरूपाय झाला. डाग दिल्या-खेरीज व्रण बरा होणार नाही. यावर त्याचा नाईलाज होतो. व नागदेवापुढे जवळजवळ सहा महिने तिची मातृतुल्य सेवा करतो. परंतु तरीही तिची प्रकृती दिवसेदिवस खंगत जाते. तिला जणू कांही पार्थिवाची ओढ लागली आहे. आपण आता चक्रधरव्यापी झालो आहे हे तिला कळून चुकले आहे. अशा स्थितीत तिच्या मनोमानसी केवळ चक्रधर आहे हे बघून दु:खी झालेला नाग-दवाचार्य मरणोन्मुख महदंबेला म्हणतो, म्हौ तुला चक्रधर आठवतो काय ? "म्हौ, देवो आठवितो, त्यावर महदंबा म्हणते हो नागदेवा आठवतो, यावर नागदेवाचार्य विचारतो कैसा आठवतो आई, तेव्हा महदाइसा म्हणते श्रीमुकूटावरि फुटा, वारी तुरंग वज्य घालित असति, अशा प्रकारची ही सगुण मूर्ती आपणाला आठवते आणि म्हणून ती बेलापुरीची पूर्ण लीळा नागदेवाचार्याला सांगते आणि म्हणते ऐसा आठवतो.[४५] हे ऐकूण नागदेवाचार्याला अतीव दु:ख झाले आहे. त्याचा कंठ सद्गदित झाला आहे. या सद्गदित कंठाने तो महदंबेला म्हणतो, "म्हौ, देहपर्यंत उचित स्मरण न चुकविशी, पहिलीया दिवसापासूनी शेवटील दिसपर्यंत देवोतो तुवाचि आठविला आण देवो तो तुवाचीच आठवावा की आई : आता आपण एकाकी पडलो आहोत याची त्याला जाणीव झाली आणि चक्रधरांचे स्मरण करतच महदाइसेने आपला देह ठेविला. या महदाइसाच्या निधनाने नागदेवाचार्याला खूप मोठे दु:ख झाले व तो गहिवरून म्हणाला म्हातारी धर्मरक्षक, प्रितीरक्षक सुहृदयृत्वे

दु:ख निर्वेदू[४६] अशा प्रकारच्या दु:खानी तो व्याकुळ झाला आणि आपल्या एकाकीपणाचे दु:ख त्याने प्रकट केले. अशा प्रकारे नवगावी तिच्या निधनानंतर नागदेवाचार्याने महदंबेचा महानुभावपंथाप्रमाणे अंत्यविधी केला.

महदंबेचे जन्म - निधन अज्ञात:

महदंबेच्या निधनाविषयीची माहिती आपणास मिळते. परंतु सत्य स्वरूपात तिच्या निधनाची तिथी व शक याची माहिती कोठेही पहावयास मिळत नाही. मात्र हे निश्चित की, गोविंदप्रभू चक्रधर यांच्या निर्याणानंतर नागदेवाचार्य हयात असताना ती मृत्यू पावली आहे. तिच्या मृत्यूसमयी तिचे वय झालेले होते. ती वृध्द होती हे नागदेवाचार्यांच्या 'म्हातारी धर्मरक्षक' या शब्दावर उघड दिसते. पहिली महदाइसा ही शके ११९३ च्या सुमारास मृत्यू पावली असावी असे वा.ना. देशपांडे यांचे मत आहे. तिची नात महदाईसा हिला तिचे नाव ज्याअर्थी ठेवण्यात आले आहे. त्याअर्थी आजीच्या मृत्यूनंतर तिचा जन्म झाला आहे हे निश्चित. आता महत्त्वाचा प्रश्न हा उपस्थित होतो की ११९३ च्या नंतर जन्मलेली महदाइसा १२३४ पूर्वी मृत्यू पावली असेल तर ती वृध्द कशी असेल ? नागदेवाचा मृत्यू शके १२२४ हा नागदेव स्मृती ग्रंथात दिला आहे. परंतु याच ग्रंथात शके १२३१ मध्ये झालेल्या रामदेवराय यादवाच्या मृत्यूसमयी तो हयात असल्याचा उल्लेखही केला गेला आहे. म्हणजेच नागदेवाचार्य १२३४ च्या दरम्यान निवर्तला असावा असे वा.ना. देशपांडे यांचे अनुमान आहे. परंतु हा कालावधीही सर्वार्थाने खरा नाही. म्हातारी होऊन मेलेली महदाइसा ही १२३४ पूर्वी किंवा तत्पूर्वी निधन पावली हे विधानच सत्य वाटत नाही. कारण मृत्यूसमयी तिचे वय ५० किंवा ६० किंवा त्याहीपेक्षा जास्त असले पाहिजे आणि १२३४ मध्ये ती मरण पावली असे जर म्हटले तर ती अल्पवयात मरण पावली असे होईल. परंतु स्वत: चक्रधरही म्हातारी चर्चक, म्हातारी जिज्ञासक, म्हातारी येत काही तरी पुसतशी असे. या त्यांच्या उद्गारावरून नागदेवाचार्यांच्या

म्हातारी धर्मरक्षक या उद्गारावरून महदंबा ही म्हातारी आहे हे निश्चित आहे. हे तिच्या एकंदर वर्तनावरून आपणाला ज्ञात होते. म्हणजेच महदंबा ही १२३४ च्या पुढे म्हणजेच १२४३ किंवा तदनंतर ती मृत्यू पावली असावी नाहीतर तिचा जन्मतरी शाके ११५० किंवा ११६० च्या दरम्यानचा असावा असे म्हणावे लागेल. परंतु हे सर्व स्थूल मानानेच,कारण महानुभाव पंथीयांच्या साहित्यांत तिच्या जन्म मृत्यूचा शाश्वत पुरावा कुठेही सापडत नाही.

महदंबेचे श्रेष्ठत्व:

आता आपणाला महत्त्वाचा प्रश्न असा उभा राहतो की महदंबेच्या नावावर धवळे, मातृकीरुक्मिणी स्वयंवर, गर्भकांड ओव्या अशी तीन प्रकरणे लिहिली गेली आहेत आणि त्यापैकी पहिली दोन प्रकरणे वा.ना. देशपांडे यांनी "आद्य मराठी कवयित्री" या पुस्तकात छापली आहेत. आता प्रश्न असा आहे की महदंबेला लिहिता येत असावे का ? कारण धवळ्याचा पूर्वार्ध हा महदंबेकडून गाईला गेला आहे. परंतु मातृकी रुक्मिणी स्वयंवर व गर्भकांडाच्या ओव्या ही रचना वृत्तबध्द असल्याने ती सर्वस्व उत्स्फूर्त असेलच असे म्हणता येणार नाही, तर ती रचना लिखित स्वरूपात केली गेली असावी. कारण "मातृकी" हे वृत वापरासाठी रचनेसाठी अवघड असल्यामुळे हे रुक्मिणी स्वयंवर लिहिले गेले असावे. परंतु या माझ्या मताला तसा पुरावा मात्र मिळत नाही. परंतु जर महदंबेला ग्रंथपुराण ऐकण्याची व वाचण्याची सवय होती. म्हणजेच तिला जर पुराण वाचता येत होते, पुराणातील घटनावर ती जर चर्चा करत होती, चिंतन करत होती. एखाद्या विशिष्ट प्रकारची घटना तिला जर खोटी वाटली तर ती जिज्ञासेने वाद घालत होती यातूनच तिचे बौध्दीक पांडित्य सिध्द होते. म्हणजेच तिला लिहिता येत असले पाहिजे. कमीत कमी तिला अक्षर ज्ञान तरी असलेच पाहिजेत मग प्रश्न असा की, त्याच्या मूळ (हस्त-लिखिते) आपणास सापडावयास हव्या होत्या तर यादव कालखंडानंतर महानुभावपंथाचे साहित्य त्याचबरोबर मराठी साहित्य हिंदू धर्मद्वेष्या

५१

बहामणी कालखंडात जे अन्य प्रकारे नाहिसे करण्यात आले त्याच्यात महदंबेच्या साहित्याच्या मूळ प्रती नामशेष झाल्या असाव्यात आणि त्यामुळे आपणाला महदंबेच्या मूळ हस्तलिखिताच्या प्रती सापडत नाहीत. महानुभाव पंथाचे जे सुमारे ६००० (सहा हजार) ग्रंथ आहेत असे मानले जाते त्याच्यात अप्रकाशित व अनुपलब्ध असे आणखीही कांही ग्रंथ असावेत. परंतु या मुद्यांचा विचार करता असताना महदंबा जर पांडित्यपूर्ण असेल तर तिला लिहिता येत असावे असे मत यथायोग्य होईल.

समारोप:
--------

एकंदर महदंबेच्या चरित्राचा आपण अभ्यास केल्यानंतर हे निश्चित आहे की महानुभावपंथातील महदंबा ही केवळ आद्य मराठी कवयित्री नाही, केवळ चक्रधरांची ती शिष्या नाही तर गोविंदप्रभू चक्रधर आणि नागदेवाचार्य यांची असणारी चरित्रा त्यांचे साहित्य परिपूर्णत्वाला येण्यासाठी म्हणून महदंबा ही एकमेव कारणीभूत आहे. तिच्या चर्चक, जिज्ञासक, पृच्छक, स्वभावामुळे जशी तिच्या स्वत:ची साहित्य निर्मिती झाली त्याचबरोबर तिने विचारलेल्या प्रतिभासंपन्न प्रश्नामुळे चक्रधर गोविंदप्रभू आणि नागदेवाचार्य यांचे व्यक्तिमत्व संपन्नतेबरोबरच तिच्या संवादामुळे ते स्पष्ट होत गेले आहे व विकसित झाले आहे आणि त्याचमुळे श्रीचक्रधरांच्या आत्मगताला बोलके करण्याची क्रिया तिच्यामुळे घडली आहे तसे मराठीतील खरे प्रश्नोपनिषाद तिच्यामुळे घडली आहे. तसे मराठीतील खरे प्रश्नोपनिषाद तिच्यामुळेच आकाराला आले आहे. कांही अंशी तिची प्रतिभा ही अतिशय उच्चतम कोटीची आहे आणि त्यातूनच महानुभावपंथाचे साहित्य संपन्न झाले आहे. महदंबेच्या साहित्याने तर महानुभावपंथाच्या साहित्यात भर घातली आहे. यापेक्षा अधिक तिच्या वृत्तीमुळे महानुभावपंथीय प्रवर्तक आणि साहित्य अधिक संपन्न झाले आहे आणि म्हणूनच महदंबा ही केवळ महदंबा न राहता

ती कांही अंशी महानुभावपंथीयांच्या साहित्यातील आणि व्यक्तींच्या घडणीतील मातृत्व तिच्याकडे जाते आहे. त्याचबरोबर महानुभावपंथीयांच्यातील मानले गेलेले तीन अवतार गोविंदप्रभु, चक्रधर आणि नागदेवाचार्य यांच्या व्यक्तिमत्वाला पूर्णत्व तिच्यामुळेच स्पष्ट झाले आहे. म्हणून या तीन पिढयांना सांधणारी ती दुवा झाली आहे. गोविंदप्रभूच्या समाधीकाळापर्यंत तिने त्यांची सोबत केलेली आहे. चक्रधरांच्या अखेरपर्यंत चक्रधरांची सोबत केली आहे. तर नागदेवाचार्याला तिने आपल्या जीवनाच्या अंतापर्यंत भक्तिरस पाजून महानुभावपंथातील आचार्य पदाला नागदेवाला तिने पोहचविले आहे. आणि याचमुळे तिने तीन पिढयांना समर्थ केले आहे. महानुभावपंथाविषयी वाटणारा अभिमान हे तिचे जीवनमूल्य असल्यामुळे तिने शिष्यसंप्रदायही सुसंस्कृत केला आहे आणि म्हणून जर महदंबा महानुभाव पंथाला मिळालीच नसती तर महानुभावपंथाचे वाङ्मय समर्थपणे उभेच राहिले नसते व धर्मरक्षणही झाले नसते. म्हणून नागदेवाचार्य जे म्हणतो म्हातारी माझीया धर्माचा रक्षणगा हे विधान तितक्याच तोलामोलाचे आणि सत्य आहे. महदंबेमुळेच साहित्य परिपूर्णत्वाला पोहचले आचार्य संपन्न झाले. नागदेवासारखा आचार्य महानुभावपंथाला मिळाला. जर महदंबा महानुभावपंथाला मिळालीच नसती तर लीळाचरित्राची निर्मिती झाली असती काय ? याचे उत्तर नकारात्मक द्यावे लागेल. पण आज जे साहित्य आणि महानुभावपंथ ज्या अधिष्ठानावर अधिष्ठीत आहे, त्याच्यातील सर्वात मोठा वाटा महदंबेचाच आहे.

.....

## प्रकरण तिसरे

## संदर्भ साहित्य


१. महदंबेचे धवळे, सौ. सुहासिनी इर्लेकर, श्रीकृष्णदास महानुभाव, हैद्राबाद, प्रथमावृत्ती, १९७७.

२. लीळाचरित्र भाग २, (संपा) शं.गो. तुळपुळे, सुविचार प्रकाशन मंडळ, १९६६, लीळा क्रमांक ५३.

३. लीळाचरित्र भाग ३, (संपा) शं.गो. तुळपुळे, सुविचार प्रकाशन मंडळ, १९६६, लीळाक्रमांक ९७.

४. लीळाचरित्र उत्तरार्ध, (संपा) शं.गो. तुळपुळे, सुविचार प्रकाशन मंडळे, पुणे, १९६६, लीळाक्रमांक ३९०२.

५. लीळाचरित्र उत्तरार्ध (संपा) शं.गो. तुळपुळे, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६६, लीळा क्रमांक ३९०.

६. लीळाचरित्र भाग ३, उ.नि. लीळा क्र. ५१.

७. लीळाचरित्र उत्तरार्ध, उ.नि. लीळा क्रमांक १२५.

८. लीळाचरित्र उत्तरार्ध, उ.नि. लीळा क्रमांक ३५९.

९. लीळाचरित्र उत्तरार्ध, उ.नि. लीळाक्रमांक ४३२.

१०. लीळाचरित्र पूर्वार्ध भाग १, उ.नि. लीळाक्रमांक १४३.

११. लीळाचरित्र पूर्वार्ध भाग २, उ.नि. लीळाक्रमांक २५७, २५८.

१२. लीळाचरित्र उत्तरार्ध भाग २, उ.नि. लीळाक्रमांक २६७.

१३. लीळाचरित्र उत्तरार्ध भाग २, उ.नि. लीळा क्रमांक २६८.

१४. लीळाचरित्रा उत्तरार्ध भाग २, उ.नि. लीळा क्रमांक २६८.

१५. लीळाचरित्रा उत्तरार्ध भाग २, (संपा.) शं.गो. तुळपुळे, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६६, लीळा क्र.३०४.

१६. लीळाचरित्रा उत्तरार्ध भाग २, उ.नि. लीळा क्रमांक ४०१.

१७. लीळाचरित्रा उत्तरार्ध भाग २, उ.नि. लीळाक्रमांक ४११.

१८. लीळाचरित्रा उत्तरार्ध भाग २, उ.नि. लीळाक्रमांक ४६३.

१९. लीळाचरित्रा उत्तरार्ध भाग २, उ.नि. लीळाक्रमांक ४६४.

२०. लीळाचरित्रा उत्तरार्ध भाग २, उ.नि. लीळाक्रमांक ४६९.

२१. लीळाचरित्रा उत्तरार्ध भाग २, उ.नि. लीळाक्रमांक ४६९.

२२. महानुभावसंत, वसंत स. जोशी, मुकूद नारायण भिडे, मॉडर्न बुक डेपो, पुणे-३०, पृष्ठ क्र. ८७.

२३. श्रीगोविंदप्रभू चरित्रा (संपा) वि.भि. कोलते, लीळा क्रमांक १४.

२४. श्रीगोविंदप्रभूचरित्रा, उ.नि. लीळाक्रमांक २२४.

२५. श्रीगोविंदप्रभूचरित्रा, उ.नि.

२६. आद्य मराठी कवयित्री, (संपा) वा.ना. देशपांडे, कॉण्टीनेंटल प्रकाशन टिळक रोड, पुणे-२, धवळे पूर्वार्ध धृपद क्र.१

२७. श्रीगोविंदप्रभूचरित्रा, वि.भि. कोलते, अरुण प्रकाशन, मलकापूर लीळा क्रमांक २२४.

२८. स्मृतीस्थळ,(संपा) वा.ना. देशपांडे, कॉण्टिनेंटल प्रकाशन, द्वितियावृत्ती, १९५६, प्रस्तावना, पृष्ठ क्रमांक १.

SHIVAJI UNIVERSITY

२९. स्मृतीस्थळ, (संपा) वा.ना. देशपांडे, कॉण्टिनेंटल प्रकाशन, द्वितियावृत्ती, १९५६, प्रस्तावना, पृष्ठ क्रमांक १.

३०. प्राचीन मराठी संतकवि, (संपा.) ज.र. आजगावकर, खंड पहिला, प्रकाशक क.भा. आजगावकर, दादर मुंबई, १९५७, पृ.नं.१७०.

३१. कित्ता क्रमांक १, २१, १२२, पृष्ठ क्र. ४०, ४१.

३२. गोविंदप्रभूचरित्र, वि.भि. कोलते, लीळाक्रमांक ३१, पृष्ठ क्र. २९.

३३. लीळाचरित्र उत्तरार्ध, शं.गो. तुळपुळे, सुविचार प्रकाशन मंडळ, १९६६. लीळाक्रमांक ३५९, पृष्ठ क्रमांक २१६.

३४. गोविंदप्रभू चरित्र, वि.भि. कोलते, अरुण प्रकाशन, मलकापूर लीळा क्रमांक १२३, पृ.क्र. ८३.

३५. स्मृतीस्थळ, स्मृती क्रमांक १०४, पृ.क्र. ३३.

३६. गोविंदप्रभू चरित्र, वि.भि. कोलते, अरुण प्रकाशन, मलकापूर, लीळा क्रमांक ९०, पृष्ठ क्रमांक २९.

३७. कित्ता क्रमांक २३, पृष्ठ क्रमांक ९, १०.

३८. स्मृतीस्थळ, (संपा) वा.ना. देशपांडे, स्मृती क्रमांक १२३, पृष्ठ क्रमांक ४१.

३९. लीळाचरित्र उत्तरार्ध, शं.गो. तुळपुळे, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६६, लीळाक्रमांक ४५१.

४०. उ.नि. लीळाक्रमांक ४८३.

४१. लीळाचरित्रा उत्तरार्ध, शं.गो. तुळपुळे, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६६, लीळाक्रमांक ४५१.

४२. उ.नि. लीळाक्रमांक ४८९.

४३. स्मृतिस्थळ, (संपा) वा.ना. देशपांडे, कॉण्टिनेंटल प्रकाशन, पुणे स्मृती क्रं. ३.

४४. उ. नि. स्मृती क्र. ४.

४५. लीळाचरित्रा उत्तरार्ध, शं.गो. तुळपुळे, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६६, लीळाक्रमांक ५०१, पृ.क्र. २७६.

४६. स्मृतीस्थळ, (संपा) वा.ना. देशपांडे, कॉण्टिनेंटल प्रकाशन, पुणे, स्मृती क्र. २५४, पृ.क्र. ७६, ७७.

.....